## महत्वाचे

### प्रा.डॉ.शंकर वाघमारे यांना फुले शाहू आंबेडकर अंतरराष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार जाहीर

**केज । प्रतिनिधी**



प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय नेकनूर येथील मराठी विभाग प्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक प्रोफेसर डॉ. शंकर वाघमारे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद व पटाया इंडियन असोशियन बँकॉक यांच्या वतीने देण्यात येणारा २०२४ चा फुले, शाहू,आंबेडकर अंतरराष्ट्रीय समाज रत्न पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला. डॉ शंकर वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली २ विद्यार्थयांनी पीएच.डी पूर्ण केली आसून,४ विद्यार्थीयांना ते मार्गदर्शन करत आहेत. त्यांचे ४ पुस्तके व ४८ राष्टीय अंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रसिद्ध आहेत.त्यांनी बौद्ध साहित्य परिषदच्या माध्यमातून ६ अखिल भारतीय बौद्ध साहित्य संमेलन महाराष्ट्रत वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केली होती. तसेच त्यांनी ३ अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदा घेतल्या आहेत. हा पुरस्कार त्यांना थायलंडची राजधानी बँकॉक येथे ८ जानेवारीला वितरीत करण्यात येणार आहे. त्यांना पुरस्कारा प्राप्त झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

### संपादक बाबा देशमाने यांना मातृशोक

**माजलगाव। प्रतिनिधी**



ज्येष्ठ पत्रकार, संपादक बाबा देशमाने यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई श्रीहरी देशमाने (वय ६७) यांचे आज रविवार, दिनांक २९ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता निधन झाले. लक्ष्मीबाई देशमाने यांच्या पार्थिवावर अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. गेली दोन महिने लक्ष्मीबाई देशमाने यांच्यावर बीड येथील एका खाजगी रूग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. अतिशय मनमिळाऊ स्वभावाच्या म्हणून त्यांची ओळख होती. चाटगाव ता. धारूर जि. बीड येथे लक्ष्मीबाई देशमाने यांच्या पार्थिवावर अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यविधीला पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. दरम्यान, मुंबई येथून प्रसिद्ध होणाऱ्या आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने यांच्या त्या मातोश्री होत्या. देशमाने यांच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

### पत्रकार अभिजित नखाते यांना आजीशोक

**बीड । प्रतिनिधी**



धारूर तालुक्यातील आवरगाव येथील ज्येष्ठ नागरिक लक्ष्मीबाई बाबूराव नखाते यांचे रविवारी दुपारी दोन वाजता वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय शंभर वर्ष होते. अतिशय मनमिळाऊ स्वभावाच्या म्हणून त्यांची ओळख होती. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या, त्यांच्या पश्चात ३ मुलं, दोन मुली, सुना, जावाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात आवरगाव येथील शेतात साय. ६ वा. अंत्यविधी करण्यात आला. अंत्यविधीला पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. सावडायचा कार्यक्रम मंगळवारी सकाळी ८ वाजता होणार आहे. दरम्यान, नखाते कुटूंबियांच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे. त्या पत्रकार अभिजित नखाते यांच्या आजी होत.

### अॅल्कोहोलीक्स अॅनॉनिमस परिवर्तन अंतर समुह कार्यालय उद्धाटन समारंभ

**हेल्पलाईन नंबर ९४०४०४१४४५**

**बीड । प्रतिनिधी**

दारू सुटत नाही असे म्हणतात पण अल्कोहोलीक्स अॅनॉनिमस हा त्याला पर्याय आहे. मद्यपीसाठी मोफत काम करणार्या विश्वव्यापी संघटनेने लाखो मद्यपींची दारू थांबवून त्यांच्या कुटूंबियांच्या जीवनात शांती, सुख, आनंद परत मिळवून दिला आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण विश्वव्यापी संस्थेची सुरूवात बीड शहरात १४ एप्रिल २०१० रोजी झाली आणि बीड शहरासह ६ तालुक्यात अल्कोहोलीक्स अॅनॉनिमस मद्यपींसाठी मोफत काम करणार्या सभा सुरू झाल्या आहेत. बीड शहरात अल्कोहोलीक्स अॅनॉनिमस परिवर्तन अंतरसमुह (विभागीय कार्यालय) उद्धाटन ३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १२.३० वाजता पत्ता : नारायणी बालरूग्णालय आदर्शनगर, तेंडूलकर कॉलनी बीड या ठिकाणी होत आहे. बीड शहरातील परिवर्तन आंतरसमुहाच्या उद्धाटनानिमित्त मिनी अल्कोथॉन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात अल्कोहोलीक्स अॅनॉनिमसच्या १२ रूढी, अल्कोहोलीक्स अॅनॉनिमस समुह, अंतर समुह आणि सर्वसाम ान्य सेवा कार्याचे कामकाज, सेवा कार्याचे महत्व या विषयावर महाराष्ट्रातून आलेल्या काही जेष्ठ मद्यमुक्त सभासद आपले अनुभव कथन करतील.मोफत माहितीसाठी संपर्क क्रमांक ९९७५२१०३४१, ८६०५०२८५८५ या मोबाईल क्रमांकावर ताबडतोब संपर्क साधावा .

# किरकोळ भांडणावरून युवकावर कुऱ्हाडीने वार

## पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर घडली घटना

**नेकनूर । प्रतिनिधी**

किरकोळ वादातून अनेकदा मोठ्या गुन्हेगारी घटना घडतात. अनेकदा क्षुल्लक कारणावरून हत्येच्या घटना घडतात. रागाच्या भरात कोण काय करेल याचा काहीच नेम नसतो.

नेकनूर गावात दोन इस्माच्या वादात त्या इसमाने कुऱ्हाडीने वार केला. सदर वार डोक्यासह, कपाळ व नाकावर लागल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. जखमी मुलावर सध्या संभाजीनगर या



ठिकाणी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र या घटनेमुळे नेकनूर गावात खळबळ उडाली आहे.

नेकनूर गावातील सुमित बबन करविले या युवकाने राजाभाऊ रामभाऊ कोकाटे या युवकावर कुऱ्हाडीने वार करून गंभीर जखमी केले असून सदरील युवकावर संभाजीनगर या ठिकाणी उपचार सुरू आहेत. सदरील फिर्यादी नेकनूर पोलीस स्टेशन या ठिकाणी जखमी राजाभाऊ कोकाटे यांची पत्नी कालींदा राजाभाऊ कोकाटे यांनी सदरील आरोपी सुमित बबन करविले याच्या विरोधात फिर्याद दिली असून गुरन ३९४/२०२४ कलम१०९,११८(१)११८(२) BNS -२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी फिर्यादी व जखमी हे एकाच गावात राहणारे असून जखमी राजाभाऊ कोकाटे हे गोंधळाच्या कार्यक्रमाला असे फिर्यादी कालींदा कोकाटे यांना सांगून गावात गेले होते. त्यावेळी गावातील रस्त्यावर काहीतरी कारणामुळे यातील आरोपी सुमित करविले व राजाभाऊ कोकाटे यांच्यात शिवीगाळ झाली होती. त्या कारणावरून यातील आरोपी सुमित करविलेने लोखंडी कुराडीने जखमे राजाभाऊ कोकाटे याच्या डोक्यात जिवे मारण्याच्या उद्देशाने गंभीर दुखापत केल्याची फिर्याद कलिंदा कोकाटे यांनी दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करून गुण्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गोसावी करीत आहेत.

## जिल्हा विद्युत सल्लागार समिती बैठक ; विद्युतवितरणबळकटीकरणालावेगद्यावा:खा.भुमरे




**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

जल्ह्यात ग्रामिण भागात विशेषतः शेतकऱ्यांसाठी होणाऱ्या वीज वितरणाच्या बळकटीकरणाला वेग द्यावा,असे निर्देश खासदार संदिपान भुमरे यांनी आज दिले.

जिल्हा विद्युत सल्लागार समितीची बैठक आज नियोजन सभागृहात पार पडली. अध्यक्षस्थानी खासदार संदिपान पाटील भुमरे हे होते. तसेच राज्याचे इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नुतनीकरण मंत्री अतुल सावे, विधानसभा सदस्य आ. रमेश बोरनारे, आ.संजना जाधव, आ. अनुराधा चव्हाण, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना,महावितरणचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, अधीक्षक अभियंता संदीप दरवडे, वीणा सावंत, कार्यकारी अभियंता रमेश वाकचौरे तसेच निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर तसेच सर्व यंत्रणा प्रमुख आदी उपस्थित होते.

बैठकीत महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडल अंतर्गत जालना, छत्रपती संभाजीनगर ग्रामिण, छत्रपती संभाजीनगर शहर भागातील विद्युत वितरण प्रणालीबाबत चर्चा करण्यात आली. सुधारीत वितरण क्षेत्र पणाली व विद्युत वाहिनी विलगीकरण याबाबत माहितीचे सादरीकरण करण्यात आले. त्यासाठी अधिक भार असलेल्या ठिकाणी रोहित्र बदलणे, वाढविणे, शेतकऱ्यांना सौर कृषी पंप योजनेची योग्य माहिती मिळावी यासाठी शेतकऱ्यांना योग्य म ार्गदर्शन करणे, तसेच विद्युत हानी कमी करण्यासाठी वाहिन्यांवर उपाययोजना करणे, वाहिन्यांचे विलगीकरण करतांना आवश्यक क्रॉसिंग परवानग्यांसाठी वन विभाग, राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग इ. विभागांशी समन्वय साधणे याबाबत माहिती सादर करण्यात आली. तसेच जिल्ह्यात मंजूर झालेल्या ३३ केव्ही क्षम तेच्या ३४ वीज उपक्रेंद्रांच्या उभारणी कामाचाही आढावा घेण्यात आला. पूर्ण झालेली कामे, अंशतः अपूर्ण कामे याबाबत माहिती देण्यात आली.

विद्युत वितरण बळकटीकरणाच्या कामांना जिल्ह्यात गती द्यावी,असे निर्देश खा. भुमरे यांनी यावेळी यंत्रणांना दिले.

## नायलॉन मांजा निर्मिती, वापर व विक्री करणाऱ्यावर होणार कार्यवाही

**बुलडाणा । प्रतिनिधी**



मकर संक्रांतीच्या अगोदर व नंतर काही दिवस पतंग उडविण्याचे प्रमाण जास्त असते. त्यासाठी नायलॉन मांजा (दोरा) या धाग्याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. तसेच या मांजामुळे मानवी जीवितास, पशु-पक्षी यांच्या जीवितास धोका निर्माण होऊन जखमी व मृत होण्याच्या प्रम ाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. पर्यावरण अधिनियमानुसार संपूर्ण जिल्ह्यात नायलॉन मांजाचा वापर, विक्री व निर्मिती करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, साठवणुकदार यांना नायलॉन मांजाची विक्री व साठवणुक करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस विभाग यांनी स्वतंत्ररित्या पथके तयार करुन आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर आदेशाचे कोणतीही व्यक्ती वा संस्था यांनी उल्लंघन केल्यास पर्यावरण(संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र राहिल, असे जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशात नमूद आहे.

## निवासी सोलर पॅनल दुरुस्ती व देखभाल प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी**

पुणे येथील महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील अमृत संस्थेच्या लक्षीत गटातील उमेदवारांसाठी मोफत सोलर पॅनल इंस्टॉलेशनवर आधारीत निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम छ. संभाजीनगर येथे दि.७ ते २४ जानेवारी २०२५ या अठरा दिवसाच्या कालावधीमध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना तांत्रिक व उद्योजकीय प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रवेशासाठी पात्रता शिक्षण किमान बारावी पास, पदवीधर व तांत्रिक पदवीधारकास प्राधान्य असून वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष आहे. जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील उमेदवारांना प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर आपला अर्ज अपलोड करून, अर्जाची हार्ड कॉपी व अर्जासोबत आवश्यक कागदपत्राच्य छायांकित प्रती जोडून जिल्ह्यातील जिल्हा प्रकल्प अधिकारी या ठिकाणी प्रत्यक्ष अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

## डॉ राजेंद्र सानप यांना आदर्श ग्रंथपाल पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**



बीड येथील सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेले गत ३०वर्षीपासुन ग्रंथालय चळवळीत सक्रिय सहभागी असणारे संघर्षशिल नेतृत्व डॉ राजेंद्र सानप यांना द स्कूल एक्स्प्रेस वतीने वर्षं २०२४चाआदर्श ग्रंथपाल पुरस्कार दि.५/१/२०२५रवीवार रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन नगर रोड येथे सकाळी १०.३०वाजता बीडचे आ संदीपभैय्या क्षिरसागर, माजी आ सय्यद सलीम, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ अशोक थोरात, तहसीलदार चंद्रकांत शेळके, शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, मौलाना आझाद म हामंडळाचे शेख तय्यबभाई,डी जी तांदळे, यांच्या सह असंख्य म ान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांने सन्मानित करण्यात येणार आहे. डॉ राजेंद्र सानप हे ग्रंथालय चळवळीत ३०वर्षापासुन सक्रिय आहेत ग्रंथालयांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी आंदोलनात्मक संघर्ष करत आहेत ते बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष व मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष पदावर कार्यरत आहेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ग्रंथालय विभागाचे जिल्हाध्यक्ष आहेत. जिल्हात गाव तिथे ग्रंथालय या धोरणानुसार हि चळवळ असंख्य गावा गावात पोहचविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.त्यांना जिल्हा व राज्यस्तरीय अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .२०२३चा शरदचंद्र पवार ग्रंथमित्र पुरस्काराने खा शरद पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले आहे.बीड शहरातील इंद्रप्रस्थ कॉलनी येथे १९९९साली गुरूवर्य भगवान म हाराज सार्वजनिक वाचनालयाची सुरूवात करणारे संस्थापक आहेत.या ग्रंथालयात ते ग्रंथपाल म्हणून २५वर्षापासुन कार्यरत आहेत.

# विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी हाच प्रश्नमंजुषा स्पर्धेचा उद्देश : रणवीर पंडित

## प्रश्नमंजुषा स्पर्धेत शिवशारदा प्रथम, शारदा विद्यामंदिर द्वितीय तर जयभवानी तृतीय

**गेवराई । प्रतिनिधी**

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्रीडा आणि शैक्षणिक उपक्रम राबविले जात असून प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल असा विश्वास शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी व्यक्त केला तर शारदा ज्ञानोस्तवातील प्रश्नमंजुषा स्पर्धा अद्वितीय स्पर्धा असून विद्यार्थांच्या जडणघडणीसाठी ही स्पर्धा अतिशय महत्त्वाची आहे. या स्पर्धेतून स्वत:चे मोजमाप करुन येणाऱ्या काळात स्पर्धा परिक्षेत हे विद्यार्थी यशस्वी होऊन प्रशासनात जातील असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते ड. सुभाष निकम यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि



जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत शारदा ज्ञानोत्सवामध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत शिवशारदा प्रथम, शारदा विद्यामंदिर द्वितीय तर जयभवानी तृतीय क्रमांक पटकावला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली. शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित शारदा ज्ञानोस्तव अंतर्गत

विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. रविवार दिनांक २९ डिसेंबर रोजी गेवराई येथील र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात प्रश्नमंजुषा स्पर्धेचे उद्घाटन रणवीर अमरसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अॅड. सुभाष निकम, नगरसेवक शाम येवले यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत संस्थेच्या आठरा शाळेचे विद्यार्थी गट सहभागी झाले होते. आंतीम फेरीत जयभवानी माध्यमिक विद्यालय शिवाजीनगर गढीचे विद्यार्थी दिपक मोटे, श्रावणी वाघमारे. माध्यमिक विद्यालय सिरसदेवीचे विद्यार्थी अदिती गाडे, ऋषिकेश कोकणे. माध्यमिक विद्यालय म ारफाळाचे विद्यार्थी आतेश पवार, सुमित राठोड. माध्यमिक विद्यालय घोगस पारगावचे विद्यार्थी प्राची गर्कळ, आयुष सांगळे. शिवशारदा पब्लिक स्कूल शिवाजीनगर गढीचे विद्यार्थी आर्या नरसाळे, यशराज सोलाट तर शारदा विद्या मंदिर गेवराईचे विद्यार्थी जोशी अपील, सुश्वरा चव्हाण उतरले. त्यामध्ये शिवशारदा पब्लिक स्कूल शिवाजीनगर गढीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, शारदा विद्यामंदिर गेवराईच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय तर जयभवानी माध्यमिक विद्यालय शिवाजीनगर गढीच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकावला. सर्व विजेत्यांना उपस्थित मान्यवर ड सुभाष निकम, आयोजक रणवीर पंडित, पत्रकार विनोद पौळ, सामाजिक कार्यकर्ते अक्षय पवार, जयसिंग माने यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली.

कार्यक्रम व स्पर्धेचे सूत्रसंचालन दादाराव काकडे, सुनील चाळक यांनी केले तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक मुरलीधर पवार यांनी मानले. स्पर्धेचे तांत्रिक संचालन सदानंद कुलकर्णी, पोपट सातपुते, शेख ताहेर, अमर जाधव, सतिश मस्के यांनी केले. यावेळी जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, प्रा.काशिनाथ गोगुले, मुख्याध्यापक अशोक तौर, भक्तराज पौळ, रणजित सानप, बबन पवार, किशोर पंडित, उदय पाठक, भागवत राऊत, कल्याण कोकाटे, विश्वाभंर पवार यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चला लोकनेते विनायकराव मेटे यांनी सुरु केलेल्या व्यसनमुक्ती लढ्यात सहभागी होवू

## ३१ डिसेंबर रोजी शहरात जनजागृती रॅली

## व्यसनमुक्त बीड उपक्रमाला बळ मिळावे, ही एक सामाजिक चळवळ बनावी, यासाठी रॅलीत सहभागी व्हा : डॉ. ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

थर्टी फर्स्टच्या नावाखाली डर्टी मुहूर्त साधत नवतरुण व्यसनाधीनतिकडे वळले जातात तरुणांनी व्यसनाधीनतेकडे न जाता सजग समाजासाठी निर्व्यसनी राहावे या उदात्त हेतूने लोकनेते स्व. विनायकराव मेटे यांनी गेल्या अनेक वर्षापासून ३१ डिसेंबर रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि जनजागृतीच्या माध्यमातून युवकांनी दारू ऐवजी गरमागरम दुधासोबत नववर्षाचे स्वागत करावे ही संकल्पना अंमलातआणून कार्यक्रमाचे आयोजन केले



होते. व्यसनमुक्तीचे अभियान

**दरवर्षी दिनांक ३१ डिसेंबरच्या रात्री होणारा सांस्कृतिक कार्यक्रम यावर्षी देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आल्यामुळे रद्द करण्यात येत आहे.**

पुढे चालवण्यासाठी यंदा देखील व्यसनमुक्ती अभियाना अंतर्गत जनजागृती रॉलीचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती शिवसंग्रम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी दिली आहे.

लोकनेते स्व. विनायकरावजी मेटे साहेब यांच्या प्रेरणेने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी व्यसनमुक्त बीड अभियाना या उपक्रमा अंतर्गत अंतर्गत व्यसनमुक्ती जनजागृती महारॅलीचे दी ३१ डिसेंबर रोजी आयोजन केले आहे. हि रॅली सकाळी ०८.०० वा. श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगणा पासुन आरंभ होईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे या रॅलीचा समारोप होईल. व्यसनमुक्त बीड उपक्रमाला बळ मिळावे, ही एक सामाजिक चळवळ बनावी, यासाठी ३१ डिसेंबर २०२४ रोजी बीड शहरात भव्य अशी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे असे डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या तसेच या रॉलीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

## धनंजय मुंडेंनी माझ्या मतदारसंघात माझ्या विरोधात प्रचार केला म्हणून मी बीडला आलो

### जितेंद्र आव्हाड यांची मळमळ आणि सुडाचे राजकारण 'त्या' कॉल रेकॉर्डिंग मुळे उघड

### स्व.संतोष देशमुख यांच्या मृत्यूचे आव्हाडांना सोयरसुतक नाही, केवळ गलिच्छ राजकारण

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि बीड मधील एका तरुणाच ऑडिओ कॉल सध्या सोशल माध्यमातून व्हायरल होत आहे. धनंजय मुंडे हे माझ्या ठाण्यातील कळवा मुंब्रा मतदार संघात प्रचारासाठी आले होते. मात्र जितेंद्र आव्हाड आपली टिंगल टवाळी करण्यासाठी कधी तुमच्या मतदारसंघात आले नाही.. तुमचे धनंजय मुंडे मला पाडायसाठी मतदारसंघात आले होते.. तुम्ही मला विचारता तुम्ही धनंजय मुंडे बाबत का बोलता तर तुम्ही धनंजय मुंडे यांना विचारा जितेंद्र आव्हाड यांना पाडायला.. तुम्ही वंजारी.. मी वंजारी.... माझ्या मतदारसंघात येऊन म्हणता याला प्रचंड मताने हरवा... म्हणून मी बीडला येऊन धनंजय मुंडे च्या विरोधात बोलत आहे, अशी मळमळ जितेंद्र आव्हाड यांनी या ऑडिओ कॉल मधून बोलून दाखवली आहे.

मुळात स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मृत्यूशी जितेंद्र आव्हाड यांचे काहीही देणे घेणे दिसत नसून निवडणुकीत धनंजय मुंडे यांनी आव्हाड यांच्या विरोधात प्रचार केल्याच्या रागातून केवळ आव्हाड हे सुड बुध्दीने धनंजय मुंडेंना टार्गेट करून ओढून आणून त्यांचे नाव या प्रकरणाशी जोडण्याचा प्रयत्न करत गलिच्छ राजकारण साधत असल्याचे या ऑडिओ कॉल मुळे स्पष्ट होत आहे. विधिमंडळातील भाषणात आणि बीडच्या मोर्चातील भाषणात देखील जितेंद्र आव्हाड यांना स्वर्गीय संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यापेक्षा धनंजय मुंडे यांच्यावर वेगवेगळे आरोप करण्यातच जास्त रस असल्याचे स्पष्ट दिसून येते. बीड येथील मोर्चामध्ये वेगवेगळ्या समाजाचे लोक गोळा करा मुंडेला टार्गेट करू त्याचे मंत्रीपद घालू अशा आशयाचे आव्हाड यांचे व्हाट्सअप चॅट देखील याआधी व्हायरल झाले आहेत. नेहमीच वादग्रस्त वक्तव्य करून चर्चेत राहणारे जितेंद्र आव्हाड यांनी आता केवळ आणि केवळ धनंजय मुंडे यांची बदनामी करण्याचे गलिच्छ राजकारण या घटनेच्या आडून सुरू केले असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.

## आष्टीतील जळजळीत वास्तव!

### आ.सुरेश धस यांनी स्वतःच्या बंगल्यावर बोलावली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची बैठक, प्रत्येकी दोन हजारांची वर्गणीही केली गोळा

### मीटिंग व कार्यक्रमाच्या खर्चाच्या नावाखाली गरीब कर्मचाऱ्यांकडून दोन हजारांची सक्त वसुली!

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टीचे आमदार सुरेश धस यांचा आणखी एक कारनामा आणि आष्टीत सुरू असलेले जळजळीत वास्तव उघड झाले असून, आज दिनांक २९ डिसेंबर रोजी सुरेश धस यांनी आष्टी येथील आपल्या बंगल्यावर तालुक्यातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत अधिकारी रोजगार सहाय्यक यांची बैठक बोलावली होती. या बैठकीस येणे सर्वांना अनिवार्य करण्यात आले होते तसेच या सर्व लोकांकडून मीटिंग आणि कार्यक्रमाचा खर्च म्हणून प्रत्येकी दोन दोन



हजार रुपयांची वसुली केली गेली असल्याचे उघडकीस आले आहे.

रोख रक्कम भुजबळ नावाच्या महिला कर्मचाऱ्याकडे तर फोन पे द्वारे अमोल कर्डिले या ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडे या दोन दोन हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. खेंगरे भवर मुळीक कर्डिले खिलारे लोंढे पांडुळे बोरुडे तांदळे मोरे अशा जवळपास ५० कर्मचाऱ्यांकडून ही वसुली करण्यात आल्याचे समोर आले असून, याबाबत सोशल मीडियावर देखील काही पोस्ट व्हायरल झाल्या आहेत.

आमदार सुरेश धस हे आधीच वादाच्या भोवऱ्यात असून मागील दोन चार दिवसात केलेल्या काही आरोपांमध्ये तोंडावर पडल्याने ते चर्चेत आहेत. त्यातच आता ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत अधिकारी ते अगदी अत्यंत कमी पगारावर काम करणारे रोजगार सहाय्यक यांच्याकडून स्वतःच्याच बंगल्यावर बोलावलेल्या बैठकीसाठी अशा प्रकारे सक्तीची वसुली करून दोन-दोन हजार रुपये गोळा केल्याने, धस आणखीनच वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. तर दुसरीकडे अशा प्रकारची शासकीय कर्मचाऱ्यांकडून केली जाणारी वसुली ही बेकायदेशीर असून याबाबतीत जिल्हाधिकारी चौकशी करून कारवाई करणार का असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

## गावातील प्रश्न गावातच मिटवा

### चाकरवाडी, पांढऱ्याची वाडी येथे तहसीलदार शेळके यांचे गावकऱ्यांना आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

शुक्रवार २७ डिसेंबर रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , येळंबघाटच्या मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांनी पांढऱ्याचीवाडी , चाकरवाडी येथे विविध कामासाठी भेट दिली .

बीडचे प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे ग्रामीण भागात दौरे सुरू आहेत .

पांढऱ्याची वाडी येथे शेतीच्या वादासंदर्भात तहसीलदार शेळके यांनी दुपारी ११ च्या सुमारास भेट दिली . वादी, प्रतिवादी व पंच यांच्या समक्ष पाहणी केली . रीतसर पंचनामा करून घेतला . सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतले व सर्व क्षेत्राची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली . त्यांनतर श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे जाऊन संत श्री ज्ञानेश्वर माऊली दादांचे समाधीस्थळी जाऊन दर्शन घेतले. तहसीलदार यांनी स्वतः गावात येऊन शाळेला भेट देणे , गावकऱ्यांची प्रत्यक्ष संपर्क साधणे , यामुळे गावकऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना यांना मनस्वी आनंद झाल्याचे दिसून आले . अशाप्रकारे तहसीलदार दर्जाचे अधिकारी गावकऱ्यांची बोलत असतील , त्यांच्या अडचणी समजून घेत असतील तर शासनाचे व जिल्हा प्रशासनाचे आभार मानले पाहिजे, असे यावेळी गावकऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले .

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा: जगताप, मुळूक, गलधर

### ▸बीड जिल्हा शिवसेनेची बैठक संपन्न!

**बीड । प्रतिनिधी**

बीडसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेनेने तयारी सुरु केली आहे. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने काल रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी




बीड जिल्हा शिवसेनेची बैठक दुपारी बारा वाजता हॉटेल ग्रॅंड यशोदा येथे संपन्न झाली.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात राज्याला प्रगतीपथावर नेले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह विविध योजना राबवून महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न शिंदे यांच्या कार्यकाळात झाला. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या उल्लेखनिय कामामुळे विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला मोठे यश मिळाले असून राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील शिवसेनेची सत्ता यावी, या दृष्टीने शिवसेना तयारीला लागली असून म जबुतीने पुढे जाणार आहे. बीड जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले. दरम्यान यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चा झाली. याप्रसंगी बीड जिल्ह्यातील शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना व सर्व अंगीकृत संघटनेचे सर्व पदाधिकारी आजी-माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी उपस्थित होते.

## सीसीआय कापूस खरेदी आजपासून पुन्हा सुरु - संचालक धनंजय गुदेकर



**बीड:** तालुक्यातील कापूस खरेदी वातावरण बदलामुळे बंद होती. अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला असल्याने बीड तालुक्यातील ३० डिसेंबर पर्यंत कापूस खरेदी सीसीआय कडून थांबविली होती. मात्र आता ही कापूस खरेदी पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती धनंजय गुंदेकर, संचालक, छत्रपती श्री शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती, बीड यांनी दिली आहे.

अशी असेल आठवड्यातील दिवसनिहाय कापूस खरेदी- सोमवार - सिद्धी ॲग्रो, बीड, मंगळवार - श्री नगद नारायण कॉटन, साक्षाळपिंप्री, बुधवार - सिद्धी ॲग्रो, बीड, गुरुवार - नर्मदादेवी कॉटस्पिन, मैंदा, शुक्रवार - श्री हरी ट्रेडिंग कंपनी, वडवणी, शनिवार, रविवार - खरेदी बंद

## शेतकरी आंदोलनातून राजकीय भूमिका ! सेवाग्राम (वर्धा) येथे शेतकरी- वारकरी, कष्टकरी महासंघाचे चर्चासत्र

शेतकरी हा आपल्या जीवनात सतत संघर्ष करीत आलेला आहे . स्वातंत्र्याच्या अगोदर व स्वातंत्र्यानंतर सुद्धा आजही त्याची विटंबना व शोषण थांबलेले नाही. त्याला जीवनात स्थिरता व न्याय,हक्क व अधिकार मिळाले नाहीत . सतत गेल्या ७५ वर्षात काँग्रेस व बीजेपी या राजकीय पक्षांनी स्वतःच्या हिताचे कायदे बनविलेत , मात्र शेतकऱ्यांच्या विरोधात कायदे तयार केलेत. शेतकरी सतत दुःखात आहे, संकटात आहे, असे दररोज ओरडून काही निष्पन्न होणार नाही, त्यासाठी ती योग्य पावले उचलावी लागेल.राजकीय पक्षांनी शिवाजी महाराजांचे नाव घेऊन, तर कोणी राम मंदिराचे नाव घेऊन शेतकऱ्यांना सतत बेवकूफ बनविण्याचे व सतत फसवीण्याचे धंदे केलेत.

या अगोदर दिनांक १२ डिसें. २०२४ गुरुवारला रावेरी(सीतामंदिरट्रस्ट,राळेगाव ,जी.यवतमाळ) येथे नियोजन समितीची पहिली बैठक झाली. त्या बैठकी ला महाराष्ट्रातून अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती . तेथे ठरलेल्या कार्यक्रमाची रूपरेषा व शेतकरी आंदोलना ची राजकीय भूमिका, विस्तारित करण्याकरिता ही दुसरी बैठक ( सेवाग्राम आश्रम , वर्धा ) येथे घेण्यात येत आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सर्वच शेतकरी आंदोलनातील नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी,राजकीय भूमिका घेणाऱ्यांनी सामील व्हावे. असे आवाहन सरसेनापती श्री धनंजय पाटील काकडे यांनी केले आहे. .

विषय:-- शेतकरी राज्य येण्यासाठी सक्रिय सहभाग ? १) दिनांक:-.१२ जानेवारी २०२५ रविवार. २) वेळ :- सकाळी १० ते ६ .(दुपारी १ ते १.३० जेवणासाठी सुट्टी. प्रत्येकाची स्वयंसेवा राहील , जेवणाचा खर्च- प्रति थाळी ११० /- ₹ , सेल्फ पे सर्विस राहील) ३) स्थळ :- सेवाग्राम (बापूकुटी जवळ शांती भवन, नई तालीम शाळा. सेवाग्राम परिसर ), वर्धा.




नाव नोंदणी करावी, तेव्हा चर्चासत्रात भाग घेता येईल. खालील मान्यवर व्यक्तीशी संपर्क करावा. निमंत्रक : १)श्री धनंजय पाटील काकडे. ९८९०३६८०५८. सरसेनापती शेतकरी आंदोलन समिती. २)श्री वसंतरावजी ढोके, यवतमाळ ३)श्री बाळासाहेब देशमुख रावेरीकर , राळेगाव ४)श्री पुरुषोत्तम राव गावंडे साहेब आर्णी, (मुंबई ) ५) एड. अशोकराव यावले, अध्यक्ष - श्री गुरुदेव सेवा मंडळ नागपूर.६) श्री संजय मुळे पारडी नागपूर. ७) श्री सोमराज तेलखडे कारंजा, वर्धा. ८) श्री शेखर जैन वर्धा. ९)डॉ.सौ. रेखाताई नीमजे , नागपूर, १०) सौ.सारिका सुरेंद्र तीमांडे, तरोडा,वर्धा .११)श्री जनार्दन मगर पाटील हिंगोली. १२) श्री रुपरावजी वाघ माजी उपसेवा सर्वाधिकारी, गुरुकुंज. १३) श्री अरुणराव वऱ्हाडे, नागपूर. १४) श्री गजानन भंडावले .जालना. १५) श्री काकासाहेब साबळे जालना. १६) श्री दिलीप पाटील बच्छाव नाशिक. १७) श्री सुधाकर मोगल नाशिक.१८) श्री गिरधर पाटील वर्धा. श्री रवींद्र भाऊ अंबाडकर अमरावती. श्री दीपक पाटील कथे दर्यापूर ,बाळासाहेब मेटकर चिंचोली अमरावती. महिला आघाडी महाराष्ट्र.- डॉ .रेखाताई निमजे नागपूर, सौ. सारिकाताई सू. तीमांडे तरोडा (वर्धा जिल्हा महिला आघाडी प्रमुख) , सौ. अलका डहाके अमरावती, मुक्ताई चांभारे वर्धा, वर्षाताई जवादे वर्धा , विद्याताई वाघमारे सेलू, सरिताताई इंगोले अमरावती, महानंदाताई गावडे कल्याण, भारतीताई कापसे निफाड नाशिक, मालतीताई कोटपललिवार नागपूर, कल्यानीताई कडू धोटे जालना, सुरेखाताई खंडागळे रायगड. सविताताई जांबे करजगाव, मंगलाताई करांगळे जळगाव जामोद, मनिषाताई महल्ले, अकोला, मनीषाताई पुंडे भंडारा, सुषमाताई खोत रायगड, विजयाताई वाढणकरअमरावती , जाधव महाराज देहू, माधव जामकर पुणे, सुरेश देसाई पुणे, मधुकर थेटे पुणे, खूप सुंदर महाराज पुणे, संभाजी महाराज गुनाठ पुणे , शिवराम पाटील जळगाव, दिलीप भाऊ गायकवाड सातारा. ,श्री प्रभाकर घाटोळ वरूड , सुभाष पाटील धोटे अमरावती, सुनील पाटील साबळे दर्यापूर, शेखर काकडे नागपूर , प्रदीप उबाळे काटोल, इत्यादी बंधू आणि भगिनींनी आता पर्यंतच्या सर्वच कार्यक्रमाला सहकार्य केले आहे.

